Estd 1962

Naac 'A++' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दि.१८/७/२०२२

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल २०२२ उन्हाळी सत्राच्या एकुण **७४१** अभ्यासक्रमाच्या परीक्षापैकी विद्यापीठस्तरावरील **५६१** परीक्षांपैकी ७८ परीक्षांना दि.१९ जुलै २०२२ पासून एम.सी.क्यू.ऑफलाईन पध्दतीने सुरवात होणार आहे. या परीक्षा अत्यंत सुरळीतपणे व निर्विघ्नपणे पार पडाव्यात यासाठी विद्यापीठ परीक्षा विभागाने सर्वोतोपरी तयारी केली आहे. या सर्व परीक्षेसाठी एकुण **१४७८०६** इतके विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. तसेच सर्व परीक्षांची वेळापत्रके तसेच प्रवेशपत्रे (Hall Tickets) विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहेत.

या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणा–या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. सदर पथकाकडून परीक्षेत गैरप्रकार करणा–या विद्यार्थ्यांवर गैरप्रकार म्हणून प्रत्यक्ष नोंद करुन परीक्षा प्रमाद समितीमार्फत नियमानुसार कारवाई विद्यापीठामार्फत करण्यात येणार आहे. तसेच परीक्षेचे पाविञ्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.ए.एन.जाधव यांनी दिले.